RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

# बिमटेक इन्शुरन्स परिसंवादात हवामान बदलाच्या परिणामांवर चर्चा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

'शाश्वत मूल्य साखळी विस्तारताना मालमत्ता, कॅज्युअल्टी, आरोग्य आणि जीवन विम्यावर होणारा हवामान बदलाचा परिणाम' या विषयावर बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी (बिमटेक) च्या वतीने एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. हवामान बदल, विमा आणि शाश्वतता यांच्यातील महत्त्वाच्या संबंधांविषयी यावेळी माहितीपूर्ण चर्चा झाली. भारतातील आघाडीच्या बी- स्कूल्सपैकी एका बी- स्कूलने मुंबईत सातव्या बिमटेक विमा परिसंवादाचे आयोजन केले होते.



बिमटेकचे संचालक डॉ. एच. चतुर्वेदी यांनी मनोगत व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय ग्राहक धोरण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि जनरल इन्शुरन्स कौन्सिलच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष प्रो. बेजॉन कुमार मिश्रा यांनी परिसंवादाच्या संकल्पनेवर आधारित विचार मांडले. एलआयसी ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष एम. आर. कुमार यांनी आपल्या भाषणातून चर्चेला दिशा दिली. 'इंडिया इन्शुरन्स रिपोर्ट'चे यावेळी अनावरण करण्यात आले. त्यामध्ये भारतातील विमा बाजारपेठेच्या सद्य स्थितीविषयी माहिती देण्यात आली. यावेळी प्रो. बेजॉन कुमार मिश्रा यांनीही आपले विचार मांडले.